| | कि.फौ.अ. क्र. ३१७/२०२० मध्ये निशाणी क्र. १५ खालील आदेश<br>दिनांक ०९ सप्टेंबर, २०२१ |
|---|---|

सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी दाखल केलेला असुन त्यांनी या अर्जाद्वारे त्यांच्याविरोधात दि. २५/०२/२०२१ रोजी विना लेखी जबाब प्रकरण चालविण्याचा आदेश बाजुला सारुन त्यांचा लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मागितलेली आहे. अर्जात असे नमुद करण्यात आले आहे की, कोविड–१९ माहामारीच्या पाश्वभुमीमुळे गैरअर्जदारांचा त्यांचे वकीलांशी संपर्क होवु शकला नाही. गैरअर्जदार हे त्यांचा लेखी जबाब दाखल करुन प्रकरणामध्ये आपली बाजु मांडण्यासाठी इच्छुक आहे. लेखी जबाब दाखल करण्यासाठी झालेला विलंब हा हेतुपुरस्सर केलेला नाही. त्यामुळे त्यांनी विना लेखी जबाबाचा आदेश बाजुला सारुन त्यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळविण्याची विनंती केली आहे. त्यावर अर्जदाराचे विद्वान वकीलांनी आपले म्हणणे मांडले. त्यात त्यांनी असे नमुद केले की, गैरअर्जदारांनी विलंबासाठी सुचविलेले कारण सयुक्तीक नाही. त्यांचे प्रकरणातील वर्तन बघता सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती त्यांनी केली.

२. अर्जाचे अवलोकन केले. गैरअर्जदारांना समंस तामिली झाली ही बाब विवादीत नाही. याठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, दिवाणी प्रक्रिया संहितेमधील मुदतीच्या आधारावर कोणताही पक्षाचा हक्क बाधीत होवु नये असा कायदयाचा प्रघात आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे सदर अर्जासोबत गैरअर्जदारांनी त्यांचा लेखी जबाबसुध्दा पटलावार दाखल केला आहे. गैरअर्जदारांना लेखी जबाब दाखल करण्यासाठी परवानगी दिल्यास वादीला कोणतेही नुकसान होण्याची परीस्थिती नाही. उलटपक्षी त्यांचा लेखी जबाब पटलावर असल्यास उभय पक्षांना त्यांची बाजु मांडण्याची पुरेपुर संधी देवुन गुण व दोषांच्या आधारावर प्रकरण निकाली काढता येईल तसेच संभाव्य इतर प्रकरणांना सुध्दा रोक लावता येईल. सबब, दाव्यातील परीस्थिती बघात पुढील आदेश पारीत करण्यात येते.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. झालेल्या विलंबासाठी गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ हिस खर्च रु. ३००/– द्यावे.

(ह.ना. पोले)

कळमेश्वर — न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र. २

दिनांक ०९/०९/२०२१ — कळमेश्वर

## ENDORSEMENT

| | | |
|---|---|---|
| Application Argued on | : | 09.09.2021 |
| Order dictated on | : | 09.09.2021 |
| Transcription Ready on | : | 09.09.2021 |
| Order checked and signed off | : | 09.09.2021 |

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of the this PDF file order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer :- R.S. Daware (Gr. III)